# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com
दुरध्वनी-02456 221450

वाचा- 1. साथरोग प्रतिबंध कायदा 1897 चे कलम 2, 3 व 4

2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.

3. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.DMU/2020/CR-92/DISM -1, दि23.03.2020 व दि.25.03.2020दि.13.04.2020दि15.04.2020, दि.17.04.2020,दि.18.04.2020 व दि.02.05.2020

4.या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144 कावी दि.31/03/2020 व दि.13/04/2020दि.17/05/2020

5- जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/ ईलेक्ट्रीकल व स्टेशनरी सा. दुकाने /आदेश क्र-117 दि.09/05/2020

6. महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र.DMU/2020/CR-92/DISM -1 दि.17/05/2020

---

दिनांक.17.05.2020

जा.क्र.2020/डिसी-1/ कोवीड-19/ ईलेक्ट्रीकल व स्टेशनरी सा. दुकाने /आदेश क्र- 131

**आदेश:**

**ज्याअर्थी,** जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषत केला आहे. कोरानाग्रसत रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये म्हणुन सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक निर्माण होऊ शकतो या मुळे फौजदारी प्रकीया संहिता 1973 चे कलम 144(1)(3) अन्वये संपुर्ण जिल्हयामध्ये संचारबंदी लागु झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

संदर्भीय क्र.3 च्या आदेशा नुसार सुरक्षततेच्या सर्व उपाय योजनाचे पालन करुन सर्व प्रकारचे ईलेक्ट्रीकल व स्टेशनरी साहित्याचे दुकाने सुरु ठेवण्या बाबत निर्देश दिलेले होते.त्या नुसार या कार्यालयाचे आदेश क्र.5 अन्वये सदरील दुकाने आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्ती च्या आधारे एक दिवस आड सुरु ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच संदर्भीय क्र. 6 च्या आदेशान्वये महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि.31/05/2020 पर्यंत वाढवलेला आहे.

**त्याअर्थी,**मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हिंगोली खालील प्रमाणे ठरवुन देण्यात आलेल्या **अटी व शर्तीच्या अधिन राहुन दररोज सकाळी 08.00 ते दु 01.00 या वेळेत जिल्हयातील ईलेक्ट्रीकल व स्टेशनरी साहित्याचे दुकाने सुरु ठेवण्याची या आदेशा अन्वये परवानगी देण्यात येत आहे.**

**सदरील दुकाने सुरु करते वेळेस खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.**

1. संबंधितानी दुकानाची सुरुवात करताना संपुण जागेचे सेनिटायझेशन करुनच सुरुवात करावी.
2. दुकानातील कामावर आलेले कामगार व खरेदीदार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे की, नाव, संपर्काचा पत्ता व मोबाईल क्रमांक.
3. दुकानदाराने व त्यांच्या सोबत काम करणा-या कामगारांनी नेहमीच नाक आणि तोंड माक्सने पुर्णपणे झाकुन ठेवणे बंधनकारक आहे.
4. खरेदी करण्यासाठी आलेल्या दोन ग्राहाकामध्ये एक मिटरचे अंतर राहील यांची दक्षता संबधीत विक्रेत्यांनी घ्यावी. तसेच Sanitizer उपलब्ध ठेवण्यात यावेत.
5. खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना उभे राहण्यासाठी दुकानासमोर 1 मिटरचे अंतराने गोल/चौकोन आखणी करणे आवश्यक राहील.
6. कामावर येणा-या कामगारांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी.
7. दुकानदारांनी कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावेत.
8. दुकानाच्या परिसरामध्ये कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य ठिकाणी करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील यांची दक्षता घेण्यात यावी.
9. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन दुकानाच्या ठिकाणी व परीसरामध्ये सामाजीक अंतराचे ( social Distance ) पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षततेच्या उपाययोजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

या आदेशामध्ये नमुद कालावधी वगळता इतर कालावधीमध्ये कोणासही घराच्या बाहेर पडता येणार नाही.तसेच आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल यांची दक्षता घ्यावी.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

संबंधित आयोजक तसेच आस्थापना मालक/चालक/व्यवस्थापक यांना प्रत्येकास आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, उप विभागीय दंडाधिकारी, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, पोलीस स्टेशन, सर्व जि.हिंगोली यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हे आदेश दिनांक.17/05/2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

स्वा/-
**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर

1.मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-32.

2.मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

प्रतिलीपी — आवश्यक कार्यवाहीस्तव

1.पोलीस अधिक्षक हिंगोली

2.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली

3.उपविभागीय दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत

4.जिल्हा कामगार अधिकारी हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.

5.तालुका दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/सेनगाव/वसमत/औंढा ना. यांनी आदेशात नमुद केल्या प्रमाणे आपल्या स्तरावरुन कार्यवाही अनुसरण्यात यावी.

6.मुख्याधिकारी नगरपालीका/नगर पंचायत हिंगोली/वसमत/कळमनुरी/सेनगांव/औंढा यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

7.जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना प्रसिधीस्तव.

**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली.**

Scanned by CamScanner